**Goadoot (Sunday, 29th July 2018) pg 6**

# कृषिदिनानिमित्त जागृती फेरी

**आमोणे, दि. २८ (वार्ताहर)**

ग्रामीण कृषी कार्यक्रमाअंतर्गत सुळकर्णा येथील डॉन बॉस्को शेतकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कृषिदिनानिमित्त कृषिदिन व वनमहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. राकेश कवळे, डॉ. प्रशांत पाटील व प्रा. राजन शेळके आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी रोपटी लावण्याची प्रात्यक्षिके सुळकर्णा माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना करून दाखविली. डॉ. राकेश कवळे यांनी रोपटी कशी लावावीत, त्यांचे संगोपन, पर्यावरण समतोल राखण्यास त्यांचा कसा उपयोग होतो याबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी गावातून गोळा केलेली विविध प्रकारची रोपटी लावण्यात आली.

त्यानंतर मळकर्णे गावात विद्यार्थ्यांनी फेरी काढली. यावेळी त्यांच्या हातात पर्यावरणाचे महत्त्व लिहिलेले फलक होते. त्यांनी विविध घोषणा देऊन परिसरात जागृती केली. शेवटी घोषणा फलक स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. सरकारी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिंधू प्रभुदेसाई यांनी मानले.




➲ कृषिदिनाचे औचित्य साधून सुळकर्णा गावात विद्यार्थ्यांनी काढलेली जागृती फेरी.
(छाया : रामदास भगत)